ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# बौध्द धम्म आणि एन. शिवराज

**प्रविण कैलास अब्रगड**
संशोधक विद्यार्थी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रस्तावना :**

बौध्द धम्म हा भारतातील पहीला धम्म आहे ज्या धम्माने पारंपारीक भारतीय समाज व्यवस्थेला तडा देऊन नविन समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न हा इ.स.पू. सहाव्या शतकात केला. बौध्द धम्म हा हिंदु धर्मातील अनिष्ट चालीरीती, कर्मकांड, पुरोहीत वर्गाच्या विरुध्द आवाज उठविणारा व प्रतिक्रांती म्हणून पुढे येणारा धम्म होय. हजारो वर्षापासून चालत आलेल्या जातीप्रथेला भारतामध्ये प्रथमतः कोणी विरोध केला असेल तर तो म्हणजे बौध्द धम्माने. बौध्द धम्माने विरोध करायचा म्हणून केलेला नव्हता तर बुध्दांना सामाजिक वास्तव माहित होते की, समाजाला त्यासाठी पर्यायी व्यवस्था दयावी लागते तेव्हांच समाज परिवर्तनाला तयार होतो. बुध्द धम्म हा स्वंयप्रकाशित व्हा हे तत्व मानणारा धम्म आहे म्हणून या धम्माने जो धर्म मानवाला काही प्राप्त करण्यासाठी वा मिळविण्यासाठी मध्यस्थाची गरज असते असे सांगतो त्या धर्माला नाकारुन भारतीय समाजाला नव्हे तर संपूर्ण जगाला पर्याय म्हणून बौध्द धम्म दिला. मोठ्याा प्रमाणात हा पर्याय भारतीय समाज व्यवस्थेने स्विकारला परंतू ही स्थिती फक्त बुध्द जिवंत असे पर्यंत होती व नंतरच्या काळात बुध्द धम्माला उतरती कळा लागली. बुध्दांनी जी पर्यायी व्यवस्था समाजाला दिली वा जो बुध्द धम्म दिला त्याला जगातले पहिले धम्मचक्र परिवर्तन असे म्हणतात.

बुध्दा नंतर सम्राट अशोकाने व नंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्माला जगात प्रसिध्दी मिळवुन दिलेली दिसते. असे असले तरी डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरापूर्वीही भारतात बौध्द धम्माचा प्रसार होता परंतू त्याचे स्वरुप हे लहान होते. डॉ. आंबेडकरांपुर्वी एन. शिवराज यांचे वडील नमोशिवायम पिल्लई यांनी दी साऊथ इंडियन बुध्दीस्ट असोशिएशन या संस्थेतर्फे बौध्द धम्म स्विकारलेला होता त्यामुळे एन. शिवराज हे डॉ. आंबेडकरांपूर्वीच बौध्द झालेले होते.1 परंतू एन. शिवराज यांनी जोपर्यंत डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत सहभाग घेतला नव्हता तो पर्यंत त्यांनी कुठलेच धार्मिक कार्य केले नव्हते तर डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत सामील झाल्यानंतर त्यांनी आपले बौध्द धम्म प्रचाराचे कार्य चालु केलेले दिसते.

या मध्यंतरीच्या काळात बौध्द धम्म हा भारतामधुन लुप्त झाल्यागत झाला असला तरी विदेशामध्ये म्हणजेच चीन, जापान, तैवान, श्रिलंका, थायलंड इत्यादी अनेक देशात हा धम्म विकशित झालेला दिसतो.

**एन. शिवराज यांचा धर्मांतराला पाठिंबा :**

एन. शिवराज यांनी डॉ. आंबेडकरापूर्वीच बौध्द धम्म स्विकारला असला तरी बौध्द धम्माच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांच्या संपर्कात येईपर्यंत कुठलेच कार्य केले नव्हते फक्त ते बौध्द होते. 13 ऑक्टोबर, 1935 ला डॉ. आंबेडकरांनी येवला या ठिकाणी भरलेल्या अस्पृशांच्या परिषदेत धर्मांतराची घोषणा केली.2 घोषणा केल्यानंतर धर्मांतराचा विचार करण्यासाठी एक सभा 12, 13 जानेवारी, 1936 ला एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे भरविण्यात आली होती. या परिशदेत भाषण करतांना एन. शिवराज म्हणाले की, ''अस्पृश्यतेच्या पाशातुन सुटण्यासाठी माझ्या मते एकच मार्ग आहे तो म्हणजे हिंदु धर्म सोडून दुसऱ्या कोणत्याही प्रचलित धर्मात जाणे हा नसुन एखादा नविन धर्म स्थापन करणे किंवा आर्यांनी हिंदु धर्म आणि त्यांच्या चालीरीती हिंदुस्थानात आणण्यापुर्वी जो आदीद्रविडांचा प्राचिन धर्म होता त्याचे पुर्नःरुजीवन करणे होय''.3 असे म्हटले होते खरे तर त्यांना प्राचिन बौध्द धम्म स्विकारावा असेच म्हणायचे असेल कारण ते स्वःता बौध्द होते. या परिशदेपासून खऱ्या अर्थाने एन. शिवराज डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या चळवळीस जोडले

गेले होते.

डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषाणा केली तेंव्हा त्यांचे अनेक सहकारी पा.ना. राजभोज, काजरोळकर आणि पी.बाळु या अस्पृश्य नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषणेचा विरोध करुन कॉंग्रेसची वाट धरली होती.4 परंतू एन. शिवराज किंचीतही न डगमगता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहीले व धर्मांतराच्या चळवळीस पाठींबा दिला कारण, त्यांच्या ठायी बौध्द धम्मातील नैतीकता होती म्हणूनच ते हे कार्य करु शकले. 14 ऑक्टोबर, 1956 च्या धर्मांतराच्या सभेत एन. शिवराज हे म्हणतात की. मी स्वतः पंधरा वर्षापासुन बौध्द झालो असलो तरी धर्मांतरासारखे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच जमले ते इतरांना व माझ्यासारख्यांना जमले नसते, ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांनी बौध्द धम्म स्विकारला तो हिंदू धर्माला पर्याय म्हणुन नव्हे तर हिंदू धर्माचे प्रयोजन हे विश्वाच्या स्वरुपाचे विश्लेषण करणे हे असुन बौध्द धम्मचे प्रयोजन विश्वाची पुर्नरचना करणे हे आहे. म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्म स्विकारला.5 असे सांगुन त्यांनी जनतेला बौध्द धम्म स्विकारण्याचा आग्रह केला होता.

### एन. शिवराज बौध्द धम्माची महती पटवुन देत

15 ऑक्टोबर, 1957 रोजी मुबई मधील नरेपार्क येथे स्वागत व सत्कार प्रसंगी केलेल्या भाशणात एन. शिवराज हे बौध्द धम्माची महती पटवुन देतांना म्हणतात की, चीन, जपान, ब्रम्हदेश, श्रिलंका, थायलंड वैगेरे देशात जाती व्यवस्था नाही ती फक्त भारतातच आहे या जातीचे निर्मूलन करणे हे डॉ. आंबेडकरांचे जीवनकार्य बनले होते. जातीचे निर्मूलन कसे करता येईल? मन मुक्त करणे हा त्यावर एकमेव उपाय आहे, मन मुक्त कसे होते? बुध्दीवादी, नितीवान शिकवणुकीमुळेच मनाला मुक्ती मिळते ही शिकवण सर्व प्रथम गौतम बुध्दांनी दिली म्हणून बुध्दाच्या मार्गाशिवाय या देशाला तरणोपाय नाही त्यामुळे संपूर्ण भारत देशाने बौध्द धम्म स्विकारावा असे त्यांना वाटे, याच भाशणात पुढे ते म्हणतात की, भारताचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल यांचा गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानावर विश्वास आहे म्हणून त्यांनी सुध्दा बुध्दाचा धम्म स्विकारावा अशी आशा व्यक्त करुन ते म्हणतात की, सम्राट अशोकाने बुध्द धम्म स्विकारुन आपल्या साम्राज्याचा विकास केला होता असे उदाहरण देऊन ते नेहरुंचे मन वळविण्याचा प्रयत्न करतात.6 अशा प्रकारे एन. शिवराज हे बौध्द धम्माचे महत्व पटवून देत व देशाच्या पंतप्रधानालाही धम्म स्विकारण्यास तयार करत असत.

### जागतिक बौध्द धम्म परिशद व एन. शिवराज

24 नोव्हेंबर ते 30 नोव्हेंबर, 1958 ला थायलंड या देशाची राजधानी बॅंकांग येथे जागतीक बौध्द धम्म परिषद पार पडली होती या जागतीक बौध्द धम्म परिषदेला एन. शिवराज व त्यांच्या शिष्ठमंडळाने हजेरी लावली होती तेंव्हा त्यांनी बौध्द धम्मीय देशांचे मुल्यांकन केले व ते म्हणतात की, 'थायलंड, ब्रम्हदेश, श्रिलंका, चीन, जपान या देशात अन्न धाण्याचा प्रश्न नाही लोक भरपुर खावुन दुसऱ्या भुकेकंगाल देशात धान्न पाठवु शकतात तसेच जमाती जमातीमधील झगडे झालेले तिकडे आढळत नाही, भिक मागतांना कोण दिसणार नाही, तिकडे कारखाणदार व कामगार, जमिनदार व कुळे, पक्षोपक्ष, पक्षांतर्गत गट यांचे परस्परांशी संबंध अत्यंत प्रेमाचे आहेत, माणसामाणसातील आदर्श संबंध तेथे आहेत या गोष्टीचे कारण म्हणजे त्या देशांनी स्विकारलेला बुध्दाचा जिवन मार्ग होय. असे मात्र भारतात घडत नाही कारण भारताने बुध्दाचा मार्ग स्विकारलेला नाही., ब्रम्ह देशाचे पंतप्रधान युनू यांनी देशातील अराजकतेचा कानोसा घेतला व चांगल्या नितीमान शिस्तबध्द लोकांच्या हातात सत्ता सुपूर्द केली, निवडणुका होत असतांना देशात अराजकता निर्माण होणे योग्य नाही त्यामुळे दुसरा देश अराजकतेचा फायदा घेऊ शकतो, तसेच सत्तेचा काडीमात्र उपयोग निवडणुकीसाठी होवू नये म्हणून त्यांनी सत्ता सोडली. पंतप्रधान युनू हे करु शकले पंडीत नेहरु असे करु शकतील काय?7 शक्य नाही कारण युनू हे बौध्द होते तर पंडीत नेहरु हे हिंदु आहेत.

एन. शिवराज यांचे तत्कालीन विचार आजच्या स्थितीला भारताला जसेच्या तसे लागु पडतात. आज भारतात सर्व क्षेत्रात अराजकता माजलेली आहे भ्रष्टाचार, स्त्रियांवरील अत्याचार, राजकीय पक्षा पक्षातील अंतर्गत दुही व त्यातुन निर्माण होणारे जातीय दंगली, (मुजफ्फर नगर येथील जातीय दंगल, उत्तर प्रदेश) पक्षा पक्षातील चालु असलेली वारसा पध्दत-क्रॉग्रेस पक्षाचे राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, शिवसेनेचे उध्दव ठाकरे, राष्ट्रवादीचे सुप्रिया सुळे, आदी या गोष्टीचे कारण म्हणजे सत्ता लोभ होय, तसेच स्त्रियांवर होणारे बलात्कार खैरलांजी, दिल्ली, कोपर्डी, बुलंदशहर येथिल बलात्कार व गुजरातच्या उनामध्ये, मध्यप्रदेशच्या मंदसौर रेल्वे स्थानकावर,

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

कर्णाटकात चिकमंगलुर, बिहारच्या औरंगाबाद जिल्ह्याात इत्यादी ठिकाणी दलित व मुस्लिम समाजातल्या महीला व पुरुषांना मारहान व अपमानित करण्याच्या ज्या घटना अलिकडेच घडल्या त्या सर्व घटनांच्या मुळाशी अनैतिकता हा घटक आहे त्यासाठी त्या सर्वांनी पर्यायाने भारताने जर बौध्द धम्म स्विकारला तर बौध्द धम्मातील नैतिकता जनतेच्या ठायी येईल व भारताला भेडवसणारे सर्व प्रश्न नश्ट होतील व रातकारनातील नैतिकता वाढेल आणि भारत देश लवकरच महासत्ता बनेल असे वाटते.

**बौध्द धम्माचा प्रसार**

बौध्द धम्माविषयी एन. शिवराज हे कृतिशिल कार्यकर्ते होते त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या प्रचारार्थ जेव्हा जेव्हा भारतामध्ये दौरे केले तेव्हा तेव्हा त्यांनी बौध्द धम्माचा प्रचार करण्याची संधी सोडली नाही. त्यांनी राजकारणामध्ये नैतिकतेला महत्व दिले त्यांनी सांगीतले की, नैतिकता ही पाया असतो जर असे नसेल तर पक्ष केव्हांही भुईसपाट होवु शकतो यासाठी ते सांगतात की, रिपब्लिकन पक्ष नैतिकतेवर आधारलेला आहे व हि नैतिकता बौध्द धम्माकडुन घेतलेली आहे. रिपब्लिकन पक्ष तेव्हांच इतर पक्षांवर भारी पडु शकतो जो पर्यंत त्यांच्याकडे नैतिकता आहे जेव्हां ही नैतिकता राहणार नाही तेव्हा पक्षाची शकले होतील एन. शिवराज यांचे तेव्हांचे मत आजही जसेच्या तसे लागू पडते आज आपल्याला रिपब्लिकन पक्ष कोणत्या अवस्थेत आहे हे माहीत आहे पक्षाची ही अवस्था नैतिकता सोडुन दिल्याने झाल्याचे दिसते जर हा पक्ष आपली नैतिकता कायम ठेवु शकला असता तर कदाचित आजचे चित्र वेगळे असते

एन. शिवराज हे राजकीय कार्यक्रमामधुन बौध्द धम्माचा प्रचार करत असत व बौध्द धम्म हा भारतीयांसाठी कसा उपयुक्त आहे हे पटवुन सांगत असत एन. शिवराज हे राजकिय कार्यक्रमात डॉ. आंबेडकरांच्या फोटो सोबत बुध्दाचाही फोटो ठेवत असत.8 या त्यांच्या .तीमुळे रिपब्लिकन पक्ष हा फक्त बौध्दांचा पक्ष आहे अशीही टिका झाली तो भाग वेगळा.

आज एन. शिवराज यांच्या सारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे आंबेडकरी चळवळीला आवश्यकता आहे कारण आज आंबेडकरी चळवळीतील राजकिय कार्यक्रमात बुध्दांचा फोटो तर दिसत नाही उलट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बुध्द धम्मातील नैतिकता आजच्या आंबेडकरी चळवळीतील एकाही राजकिय नेत्यात आढळुन येत नाही यामुळे आंबेडकरी चळवळीचे नुकसान होवुन खरी आंबेडकरी चळवळ मागे पडत चालली आहे.

**नव बौध्दांच्या हक्कांचा लढा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक भारतात धर्मांतराची क्रांती घडवुन आणली या क्रांतीला राजकीय क्षेत्रातुन बऱ्याच दिग्गज राजकीय नेत्यांचा विरोध होता परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तो विरोध डावलुन ही क्रंाती घडवुन आणली त्यामुळे अनेक राजकीय नेत्यांच्या डोळ्याात हे खुपायला लागले याचाच परिपाक म्हणून कॉग्रेस सरकारने 29 ऑक्टोबर, 1956 ला संविधानाच्या 141 व्या कलमात दुरुस्ती केली ही दुरुस्ती 1956 ची 63 वी घटना दुरुस्ती म्हणून परिचीत आहे त्या दुरुस्ती नुसार शेड्युल कास्ट या यादीत हिंदू आणि शिख या धर्मातील मागासंवर्गीयांनाच सवलती मिळतील इतरांना नाही म्हणजेच बौध्द धम्म स्विकारलेल्यांना ह्याा सवलती मिळणार नव्हत्या म्हणुन ह्याा सवलती नव बौध्दांना मिळाव्यात यासाठी एन. शिवराज यांच्या नेतृत्वाखाली एक खासदारांचे शिष्टमंडळ पंतप्रधान नेहरुंना भेटले होते व सरकारने 14 एप्रिल, 1958 रोजी ह्याा सवलती जाहीर कराव्यात अशी मागणी केली होती.9 ही मागणी लोकसभेमध्ये एन. शिवराज यांनी लावुन धरली होती व नंतरच्या काळात त्याचा फायदा झाल्याचा दिसुन येतो तेव्हा एन. शिवराज हे करु शकले परंतु आजच्या काळात बौध्दासाठीचा बुदिस्ट पर्सनल लॉ हा कायदा पारित करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील एकही आमदार किंवा खासदार लोकसभेमध्ये हा मुद्दा मांडतांना दिसत नाहीत. शिख, मुस्लिम, हिंदु, पारशी, ख्रिश्चन या सर्वांना विवाह कायदा आहे परंतू बौध्दांना नाही यासाठी कोणीही आंदोलन, मोर्चा वा निदर्शने करतानंा दिसत नाहीत ही आंबेडकरी चळवळीतील फार मोठी शोकांतीका आहे असेच म्हणावे लागेल.

एकूणच एन. शिवराज यांनी बौध्द धम्माचा प्रचार, प्रसार करत असतांना कुठल्याही गोश्टीची तमा बाळगली नाही व आपल्या भूमिकेमध्ये बदल केला नाही. त्यांनी जागतिक परिशदेमध्ये सुद्धा बौध्द धम्म स्विकारलेले देश कसे विकसित आहेत हे पटवुन दिले व त्या देशातील नैतिकता कायम असल्यामुळे भारतासारखे भ्रष्टाचार घडलेले दिसत नाहीत व सत्तालोलुपता नसल्यामुळे त्या देशात शांतता नांदतांना आपल्याला दिसुन येते हे सर्व त्यांनी बौध्दांचा जिवनमार्ग स्विकारल्यामुळे घडले अशी मते मांडली होती.

अशा प्रकारे एन. शिवराज यांनी आपली परखड मते मांडून भारताला बौध्द धम्माची किती आवश्यता आहे हे पटवुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.